**MHRT010000072024**

## मोटार अपघात किरकोळ अर्ज क्र.०४/२०२४ मधील नि.१ वरील आदेश

| | | |
|---|---|---|
| रत्नागिरी शहर पोलीस ठाणे, रत्नागिरी. | | अर्जदार |
| विरुध्द | | |
| रिया शशिकांत मोहिते अ. पा. क. वडील<br>श्री. शशिकांत लक्ष्मण मोहिते | | सामनेवाला |

१. प्रस्तुतचा मोटार अपघात किरकोळ अर्ज (D.A.R.) हा रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्र.३१४/२०२३ शी निगडीत आहे.

२. दिनांक ०३/०१/२०२४ च्या आदेशानुसार संबंधित प्रस्तावित अर्जदार/जखमी यांना पोलीस निरीक्षक, रत्नागिरी शहर पोलीस ठाणे, रत्नागिरी यांचेमार्फत नोटीस काढण्यात आली. त्यानंतर दिनांक १६/०४/२०२६ रोजी रिया शशिकांत मोहिते यांचेकरीता अज्ञान पालनकर्ता म्हणून हजर होऊन अनुक्रमे नि.७ येथे पुरशिस दाखल करुन असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामातील रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गु.र. नं.३१४/२०२३ मधील अपघातामध्ये त्यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी कोणत्याही न्यायालयामध्ये अर्ज दाखल केलेला नाही व भविष्यामध्ये यापुढे दाखलही करणार नाही. तरी सदरचा किरकोळ अर्ज निकाली करणेत यावा. त्याअर्थी त्यांना या न्यायाधीकरणामार्फत कोणतीही नुकसान भरपाई मागण्यास स्वारस्य नाही असे दिसून येते.

३. या प्रकरणात सामनेवाला यांना किरकोळ दुखापती झालेल्या असल्याचे दिसून येते. या प्रकरणात अन्य जखमी अथवा मृत व्यक्ती आढळत नाही. अशा परिस्थितीत प्रस्तुतचा अर्ज प्रलंबित ठेवणे योग्य होणार नाही. सबब मी पुढील आदेश पारित करतो.

## आदेश

१. प्रस्तुतचा मोटार अपघात किरकोळ अर्ज क्र.४/२०२४ निकाली करणेत येत आहे.

VINOD YASHWANTRAO JADHAV
Digitally signed by VINOD YASHWANTRAO JADHAV
Date: 2026.04.16 18:35:55 +0530

रत्नागिरी. (व्ही.वाय.जाधव)

दिनांक – १६/०४/२०२६ सदस्य,

मोटार अपघात वाद न्यायाधीकरण, रत्नागिरी.

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| M.A.C.P.M.A. No. | :- | 4/2024. |
| Name of Stenographer | :- | A. B. Patil |
| Court Name | :- | Member, M.A.C.T., Ratnagiri. |
| Date of Decision | :- | 16/04/2026 |
| Order signed by P.O. on | :- | 16/04/2026 |
| Order uploaded on | :- | 16/04/2026 |